MHKO030091082026

**<u>निशाणी क्रमांक ०१ वरिल आदेश</u>**
**( <u>अक्षय मारुती सोनटक्के वि. महाराष्ट्र शासन )</u>**

अर्जदाराने प्रस्तुतच्या प्रकरणात अर्ज, त्यांचा **निळया रंगाचा मोबाईल Redmi कंपनीचा Redmi 12C, bearing IMEI No.869106066328175 चा** ताबा मिळण्याकरिता केलेला आहे. अर्जदाराप्रमाणे सदर मोबाईल गुन्हा क्र.२९९/२०२६ मध्ये पोलीस स्टेशन राजारामपुरी, कोल्हापूर यांनी जप्त केले आहे. सदर मोबाईल भारतीय न्याय संहिता कलम ५०३ प्रमाणे अर्जदाराला परत मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे.

२. सदर प्रकरणात अभियोगपक्षाने असे म्हणणे मांडले आहे की, एफ.आय.आर. मध्ये वर्णन केल्याप्रमाणे मुददेमालाचे वर्णन नाही. म्हणुन, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. तपासी अंमलदार यांनी त्यांच्या म्हणणे मांडले आहे की, सदरच्या प्रकरणात त्यांनी आरोपीच्या ताब्यातुन मोबईल जप्त केलेला असुन जप्त मोबईल अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीवर परत देण्यात यावे, अशी विनंती केली आहे.

४. अर्जदाराने मोबाईलचा मालकी हक्क सिध्द करण्याकरिता मोबाईल विकत घेतल्याची टॅक्स इनव्हाईस क्र.२३-२४/shiv/०२११७ दिनांक १६.१२.२०२३ ची प्रत व आधार कार्डची प्रत ऑनलाईन पध्दतीने दाखल केलेली आहे. मोबाईल खरेदीच्या पावतीवरुन असे दिसून येते की, सदरचा मोबाईल अर्जदारच्या नावावर आहे. मोबाईलवर ईतर कोणीही मालकी हक्क दाखविलेला नाही. यावरुन अर्जदार त्या मोबाईलचा मालक दिसून येत आहे.

५. ज्याअर्थी, अर्जदाराचे कथन की, सदरचा मोबाईल पोलीस स्टेशन, राजारामपुरी येथे पडुन आहे व त्यामुळे त्याचे नुकसान होत आहे व मोबाईल पोलीस स्टेशन येथे जमा असल्याने त्याला दैनंदिन कामात अडचणी निर्माण होत आहे हे सर्व कथन अबाधित राहीले आहे. पुढे असेही की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने **<u>सुंदरभाई अंबालाल देसाई विरुध्द स्टेट ऑफ गुजरात(२००२) १० एस.सी.सी.२८३</u>** मध्ये दिलेल्या दिशानिर्देशप्रमाणे मुद्देमाल जास्त काळ पोलीस स्टेशन किंवा पोलीसांचे ताब्यात ठेवू नये. जोपर्यंत पोलीसांना तपासकामी मुद्देमालची अत्यंत आवश्यकता राहणार नाही. माझे मतानुसार सदर प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाने सुंदरभाई अंबालाल मध्ये दिलेले दिशानिर्देश लागु होतात. पुढे असेही की, पोलीसांना मुद्देमालची अत्यंत गरज नाही, परंतु पोलीसांनी काळजीसाठी मोबाईल सोडु नये

म्हणुन आपत्ती दिली आहे. पोलीसांची आपत्ती किंवा भिती की, आरोपी भविष्यात असा प्रकारचा गुन्हा करु शकतात म्हणुन मोबाईल सोडु नये. असे लक्षात घेवुन अटी व शर्तीचे अधीन राहून मोबाईल सुपुर्तनाम्यावर सोडणे न्यायोचित होईल. म्हणुन एकंदरीत परिस्थिती पाहता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करितो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात आला.

२. पोलीस स्टेशन राजारामपुरी यांनी **निळया रंगाचा मोबाईल Redmi कंपनीचा Redmi 12C, bearing IMEI No.869106066328175 चा ताबा अर्जदार अक्षय मारुती सोनटक्के यांना** रु.१०,०००/- (रुपये १० हजार फक्त) च्या सुपूर्दनामा बॉण्ड दिल्यावर खालील अटींवर द्यावा.

अ. अर्जदाराने सदरचे मोबाईल कोणासही विकू नये व दुसऱ्या कोणाच्याही नावावर बदली करु नये.

ब. अर्जदाराने सदरचे मोबाईल पोलीस स्टेशन सातारा द्वारे तपासात किंवा न्यायालयाने खटला सुरु असतांना मागणी केल्यास सादर करावे.

क. अर्जदाराने सदरचे मोबाईलच्या रचनेत बदल करु नये व रंग बदलू नये.

ड. पोलीस स्टेशन राजारामपुरी यांनी त्या मोबाईलचा तपशीलवार पंचनामा तयार करुन व अर्जदाराच्या खर्चाने त्या मोबाईलचे चारी बाजूने, खालून आणि वरुन फोटो काढून जप्त केलेला मोबाईल अर्जदाराच्या ताब्यात दयावे.

३. सदरहु आदेशाची प्रत गुन्हा क्र.२९९/२०२६ सोबत जोडावी.

Digitally signed by ANIKET MUSALE
Date: 2026.07.02 17:17:29 +0530

कोल्हापूर ( अ. वि. मुसळे )
दि.०२/०७/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, न्या.क्र.०३, कोल्हापूर.

**CERTIFICATE**

| | |
|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order. | |
| Name of the Stenographer : | Shri. M.R. Khatib |
| Court | J.M.F.C. Court No.03, Kolhapur |
| Date | 02/07/2026 |
| signed by the presiding officer on | 02/07/2026 |
| uploaded on | 02/07/2026 |